**ISSN: 2583-6285** *Volume 4, Issue 1; Feb 2025*

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCH AND ANALYSIS IN COMMERCE AND MANAGEMENT

IJRACM

Web: https://www.iarj.in/index.php/ijracm/issue/archive

# 1. भारतातील अल्पभूधारक शेतकरी व त्यांची स्थिती

**भरत गोरखनाथ बिरंगळ**

*संशोधक विद्यार्थी*

**डॉ. खैरे महादेव गोपाळ**

*मार्गदर्शक एम.ए, पीएच.डी*

*जामखेड महाविद्यालय जामखेड, जि-अहमदनगर.*

***गोषवारा:***

*भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून आज २१ व्या शतकातही भारतीय कृषी क्षेत्राचा उल्लेख केला जातो. भारतातील एकूण लोकसंख्या पैकी ७०% लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शेती व शेतीशी सबंधित व्यवसायावर अवलंबून आहे. त्यामुळेच भारतीय अर्थव्यवस्थेला कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर जमीन सुधारणा, कुळ कायदा, कमाल जमीनधारण या सारखे विविध कार्यक्रम राबविण्यात आले त्यामुळे भारतातील अतिरिक्त ठरलेली जमीन भूमिहीन, मागासवर्गीय, लोकांना वितरीत करण्यात आली. त्यामुळे भारतात मोठी जमीन धारणा असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण कमी झाले व सीमांत शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी, मध्यम शेतकरी, आणि मोठे शेतकरी असे प्रकार पडले गेले. यामध्ये सीमांत व अल्पभूधारक यांची संख्या सर्वाधिक म्हणजे जवळपास ८५ टक्के इतके असून त्यांच्याकडे असणारे जमीनधारण क्षेत्र अत्यंत कमी आहे. असे असूनही अल्पभूधारक शेतकरी यांचे भारतीय शेतीमधील स्थान अत्यंत महत्वाचे आहे.*

***सूचक शब्द:***

*सीमांत शेतकरी, अल्पभूधारक, धारणक्षेत्र, हेक्टर, सिंचनक्षेत्र, जमीनसुधारणा.*

**प्रास्ताविक:**

भारत हा कृषि प्रधान देश म्हणून गणला जातो. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ 70 टक्के लोक संख्या ही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शेती क्षेत्रावर अवलंबून आहे.महात्मा गांधींच्या मते "भारतीय शेती ही भारतीय लोकांच्या उपजिविकेचे साधन असल्यामुळे भारतीय शेती हा भारताचा आत्मा आहे" भारताची ओळख जागतिक स्तरावर कृषी क्षेत्रामुळे आहे.मानव जातीचा उदरनिर्वाह हा प्रामुख्याने शेती क्षेत्रावर अवलंबून असल्याने भारतात मोठया प्रमाणात लोक हे शेती व्यवसाय व शेतीशी संबंधित व्यवसायावर अवलंबून आहेत.फक्त भारत देशातीलच नवे तर जगातील एकूण लोकसंख्येच्या दोन तृतीयांश लोक हे शेती व शेतीशी संबंधित व्यवसायात गुंतलेली आहे.भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मते "शेती हा मानवी संस्कृती चा सर्वात मोठा शोध आहे" आधुनिक काळात जगामध्ये प्रत्येक राष्ट्र आपला आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न करत आहे आर्थिक विकासात कृषीचे महत्व सांगताना प्रो. शुल्टज यांनी असे म्हंटले आहे "कोणतेही अल्पविकसित राष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाल्याशिवाय आर्थिक विकासाची कल्पना करू शकत नाही" आज अनेक राष्ट्र विकसित राष्ट्र म्हणून नावारूपाला आले आहेत त्या राष्ट्रामध्ये देखील पहिली क्रांती किंवा बदल कृषी क्षेत्रात झालेले आढळतात. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा पायाभूत घटक म्हणून शेतीक्षेत्राकडे पहिले जाते.

अर्थव्यवस्थेतील सर्व घटकात म्हणजे रोजगार पुरवठा, अन्नधान्य, अंतराष्ट्रीय व्यापार, उद्योग व्यवसायांना कच्चा माल या सारख्या विविध क्षेत्रात शेती क्षेत्राचे योगदान खूप जास्त आहे. विकसनशील देशाचा विकास हा अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्राच्या माध्यमातून साधला जात असला तरी त्यामध्ये शेती क्षेत्राची भूमिका खूपच महत्वाची असलेली दिसून येते, कारण विकसनशील देशाचा विकास हा खऱ्या अर्थाने प्रथमिक क्षेत्रावरच मोट्या प्रमानात अवलंबून असतो

“शेती करतो तो शेतकरी धान्य उत्पादन करून सर्वांच्या अन्नाची सोय करणारा व त्यासाठी शेती तयार करणारा, बी जमा करणारा, शेतीची पेरणी करणारा, त्यासाठी शेती मशागत करणारा, धान्य उत्पादन करून सर्वामध्ये समान वाटप करणारा, धान्य साठवण करणारा, सतत जन्मभर अशाप्रकारे धान्य उत्पादन पिकविणारा वर्ग निर्माण झाला, हाच वर्ग म्हणजे शेतकरी समाज होय. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये महत्वाची

भूमिका बजावणारे शेती क्षेत्र हे शेती कसणाऱ्या शेतकरी लोकांवर अवलंबून आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते भारतात एकूण शेत जमिनीच्या आकारमानावरून भारतीय शेतकऱ्यांचे वर्गीकरण केले जाते यात मोठे शेतकरी मध्यम शेतकरी अल्पभूधारक व सीमांत शेतकरी अशा वर्गात विभागणी केली जाते. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राला महत्वाचे स्थान असल्याने शेतकरी याला देखील अन्नन्य साधारण महत्व आहे. या वर्गा पैकी एक म्हणजेच अल्पभूधारक शेतकरी होय. अल्पभूधारक शेतकरी कोण, कोणाला म्हणावे किंवा त्याची व्याख्या या संदर्भात विविध तज्ञानी वेगवेगळी मते मांडलेली आहेत.

"महाराष्ट्र कर्ज निवारण कायदा १९७५ मधील कलम दोन(म) नुसार जो शेतकरी एक हेक्टर पेक्षा जास्त परंतु दोन हेक्टर पेक्षा कमी असलेली जमीन व्यक्तीच्या कसतो तसेच वरील मर्यादेपर्यंत असलेली जमीन असणारे कोळ किंवा बटाईदार हे अल्पभूधारक शेतकरी या व्याख्येत येतात". "भारतातील 85% शेतकरी हे छोटे आणि अल्पभूधारक अर्थात पाच एकर पेक्षा कमी जमीन जमीन असणारे आहेत".

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतीय अल्पभूधारक शेतकरी यांच्या भूमिकेचा आढावा घेण्यात आला आहे

**शोध निबंधाचे उद्दिष्टे:**

१. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका अभ्यासणे.

२. अल्पभूधारक शेतकरी संकल्पना समजून घेणे.

३. भारतीय शेतीमध्ये अल्पभूधारक शेतकरी यांचे योगदान अभ्यासणे.

प्रस्तुत शोध निबंधाचा अभ्यास करण्यासाठी द्वितीय साधनांचा (संदर्भ ग्रंथ, विविध सरकारी अहवाल, मासिक, इंटरनेट, इ.) वापर केला आहे.

भारतातील शेतकऱ्यांचे जमीनधारण क्षेत्रानुसार वर्गीकरण(हेक्टर)

**तक्ता क्र.१.१**

| अ. क्र | शेतकऱ्याचा प्रकार | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | सीमान्त | १ हेक्टर पेक्षा कमी |
| २ | लघु (अल्पभूधारक) | १ ते २ हेक्टर |
| ३ | अर्धमध्यम | २ ते ४ हेक्टर |
| ४ | मध्यम | ४ ते १० हेक्टर |
| ५ | मोठे | १० हेक्टर पेक्षा जास्त |

(Source: Agriculture Census Maharashtra -2015-16 page no-1)

**भारतातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची स्थिती:**

कोणत्याही देशाच्या विकासात कृषी क्षेत्राला खूप महत्व आहे. त्यामुळेच जगातील अनेक देशाच्या अर्थव्यवस्था या कृषि प्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखल्या जातात. भारत देश हा कृषी क्षेत्रावर वेगळ्या बाबीत अवलंबून असल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेला कृषी प्रधान अर्थव्यवस्था असे म्हटले जाते. भारतामध्ये सन १९७१ मध्ये अल्पभूधारकाचे प्रमाण १९% एवढे होते. पुढील तक्ता क्र.१.२ मध्ये भारतातील धारण क्षेत्राची संख्या व त्या शेतकऱ्यांनी धारण केलेले क्षेत्र दर्शविण्यात आले आहे.

**तक्ता क्र: १.२:**

**भारतातील धारण क्षेत्र संख्या, धारण क्षेत्र आणि सरासरी धारण क्षेत्र दर्शविणारा तक्ता**

**(दशलक्ष व हेक्टर मध्ये)**

| आकारमान | वर्गवारी | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| सीमान्त | धारणक्षेत्र धारकाची संख्या | ७५४०८ (६२.९) | ८३६९४ (६४.८) | ९२८२६ (६७.१) | १००२५१ (६८.४५) |

| **आकारमान** | **वर्गवारी** | **२०००-०१** | **२००५-०६** | **२०१०-११** | **२०१५-१६** |
|---|---|---|---|---|---|
| | धारकाचे धारण क्षेत्र | २९८१४ (१८.७) | ३२०२६ (२०.२) | ३५९०८ (२२.५) | ३७९२३ (२४.०३) |
| | **सरासरी धारण क्षेत्र** | **०.४०** | **०.३८** | **०.३९** | **०.३८** |
| लघू | धारणक्षेत्र धारकाची संख्या | 22695 (१८.९) | २३९३० (१८.५) | २४७७९ (१७.९) | 25809 (१७.६२) |
| | धारकाचे धारण क्षेत्र | 32139 (२०.२) | ३३१०१ (२०.९) | ३५२४४ (२२.१) | ३६१५१ (२२.९१) |
| | **सरासरी धारण क्षेत्र** | **१.४२** | **१.३८** | **१.४२** | **१.४०** |
| अर्धमध्यम | धारणक्षेत्र धारकाची संख्या | १४०२१ (११.७) | १४१२७ (१०.९) | १३८९६ (१०.०) | १३९९३ (९.५५) |
| | धारकाचे धारण क्षेत्र | ३८१९३ (२४.०) | ३७८९८ (२३.९) | ३७७०५ (२३.६) | ३७६१९ (२३.८४) |
| | **सरासरी धारण क्षेत्र** | **२.७२** | **२.६८** | **२.७१** | **२.६९** |
| मध्यम | धारणक्षेत्र धारकाची संख्या | ६५७७ (५.५) | ६३७५ (४.९) | ५८७५ (४.२) | ५५६१ (३.८०) |
| | धारकाचे धारण क्षेत्र | ३८२१७ (२४.०) | ३६५८३ (२३.१) | ३३८२८ (२१.२) | ३१८१० (२०.१६) |
| | **सरासरी धारण क्षेत्र** | **५.८१** | **५.७४** | **५.७६** | **५.७२** |

| **आकारमान** | **वर्गवारी** | **२०००-०१** | **२००५-०६** | **२०१०-११** | **२०१५-१६** |
|---|---|---|---|---|---|
| मोठे | धारणक्षेत्र धारकाची संख्या | १२३० (१.०) | १०९६ (०.८) | ९७३ (०.७) | ८३८ (०.५७) |
| | धारकाचे धारण क्षेत्र | २१०७२ (१३.२) | १८७१५ (११.८) | १६९०७ (१०.६) | १४३१४ (९.०७) |
| | **सरासरी धारण क्षेत्र** | **१७.१२** | **१७.०८** | **१७.३८** | **१७.०७** |
| **एकूण सरासरी धारण क्षेत्र** | | **१.३३** | **१.२३** | **१.१५** | **१.०८** |

Source: Governrment of india, Agricultural Statistics data Glance, Delhi,2022 page No-200

**टीप:** कंसातील आकडे एकुणाशी प्रमाण दर्शवितात.

वरील तक्ता क्र.१.२ वरुन असे दिसून येते की, भारतामध्ये २०००-०१ मध्ये सीमान्त शेतकऱ्याचे धारणक्षेत्र ०.४० हेक्टर एवढे होते. तर २००५-०६ मध्ये ते सरासरी ०.३८ एवढे व २०१०-११ मध्ये ते ०.३९ इतके व २०१५-१६ मध्ये ते सरासरी ०.३८ इतके आहे.

त्याचप्रमाणे भारतामध्ये लघू धारणक्षेत्र म्हणजे अल्पभूधारक शेतकऱ्याचे म्हणजेच १ हेक्टर ते २ हेक्टर सरासरी धारणक्षेत्र २०००-०१ मध्ये १.४२ हेक्टर एवढे होते. तर २००५-०६ मध्ये ते सरासरी १.३८ एवढे व २०१०-११ मध्ये ते १.४२ इतके व २०१५-१६ मध्ये ते सरासरी १.४० इतके आहे.

सीमान्त व लघू शेतकऱ्यांचे एकत्रित बेरीज करून २ हेक्टर व त्यापेक्षा कमी शेतजमीन असणाऱ्या अल्पभूधारक शेतकऱ्यांचे धारणक्षेत्र धारकाची संख्या २०००-०१ मध्ये ८१.८ एवढे होते. तर २०१५-१६ मध्ये ही एकत्रित संख्या ८६.०७ एवढे मोठे आहे.

२ हेक्टर ते ४ हेक्टर सरासरी धारणक्षेत्र असणाऱ्या अर्धमध्यम शेतकऱ्याचे २०००-०१ मध्ये २.७२ हेक्टर एवढे होते. तर २००५-०६ मध्ये ते सरासरी २.६८ एवढे व २०१०-११ मध्ये ते २.७१ इतके व २०१५-१६ मध्ये ते सरासरी २.६९ इतके आहे.

**निष्कर्ष:**

भारत देशामध्ये एकूण जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये सीमान्त व लहान (अल्पभूधारक) शेतकऱ्यांचे प्रमाण २०१५-१६ नुसार ८६.०८ एवढे जास्त आहे. परंतु त्यांच्या कडे एकूण धारण जमिनीच्या ४६.९४ टक्के एवढीच जमीन आहे. व प्रति कुटुंब धारण क्षेत्र मात्र १.७८ हेक्टर इतके कमी आहे. यावरून भारतातील धारण क्षेत्राच्या मालकी मध्ये विषमता असून भारतातील बहुसंख्य शेतकरी ही २ हेक्टरपेक्षा कमी आकाराचे आहेत.

**संदर्भ सूची:**


१. तुपे संदीप काकासाहेब (२०१३), 'सीमांत व अल्पभूधारक शेतकरी यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन विषयक संदर्भ औरंगाबाद जिल्हा' पीएचडी प्रबंध

२. चिघळीकर ज्ञानराज गोरोबा (२०१९),"कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती: एक चिकित्सक अभ्यास"

३. वासनीकर श्यामराव लक्ष्मण (२०२१), 'अल्पभूधारक शेतकरी आणि भारतीय शेती' आंतरराष्ट्रीय इ रिसर्च जर्नल

४. मधुसूदन साठे (२००८),' भारताच्या आर्थिक समस्या', डायमंड पब्लिकेशन, पुणे

५. भालेराव आणि देसाई (२०२२), भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन